RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना - NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.



अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

## “आषाढी एकादशीच्या हार्दिक शुभेच्छा !”



वर्ष ४२ वे
अंक ७ वा
१० जुलै २०२१
किंमत १ रूपया

## ।। श्री विठ्ठल रुक्मिणी प्रसन्न ।।

# यशोगाथा.... बळी राजाची




आपल्या ज्ञाती बांधवांमधे अनेक प्रतिभावान व्यक्ती आहेत. आर्थिक, सामाजिक आणि राजकिय क्षेत्रात आपले मौलिक योगदान देत आहेत. पण मूळ स्वभाव प्रसिद्धी परांङमुख असल्यामुळे, त्यांचे लोकविलक्षण कार्य समाजापुढे येत नाही. हाच धागा पकडून आपल्या चित्तपावन मित्र मधून काही यशस्वी व्यक्तींचा परिचय करून देण्याचा प्रयत्न आहे. त्याची सुरुवात मागील अंकापासून झाली. श्री. दिपक गद्रे यांच्यासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा परिचय करून देण्यात आला.

या अंकात आपण ॲड. श्री. सुहास बर्वे आणि डुबेरकर बर्वे या प्रेरणादाई कुटुंबाचा परिचय करून घेणार आहोत.

१ जुलै २०२१ रोजी श्री. सुहास बर्वे यांचा मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते कृषी दिनाचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला. २०२०-२१ च्या रब्बी हंगामासाठी राज्य सरकारने पीक स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत श्री. सुहास बर्वे यांनी आपल्या शेतातल्या एक हेक्टर क्षेत्रात ९०.७१ क्विंटल एव्हडे विक्रमी गव्हाचे उत्पादन घेऊन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश ही राज्ये गहू उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत खरी; पण तेथे प्रती हेक्टर ४०-४५ क्विंटल गव्हाचे उत्पादन होते. या पार्श्वभूमीवर श्री. बर्वे यांनी घेतलेले प्रती हेक्टर ९०.७१ क्विंटल गव्हाचे उत्पादन म्हणजे देश पातळीवरचे कीर्तिमान म्हणावे लागेल. ही बाब समस्त ज्ञाती बांधवांसाठी अत्यंत प्रेरणादाई बाब आहे. या लेखाच्या निमित्ताने आपण त्या अलौकिक व गौरवशाली परंपरा लाभलेल्या डुबेरकर बर्वे कुटुंबाच्या इतिहासाचासुद्धा परिचय करून घेऊया.

आपणा सर्वांना ज्ञात असेलच की, श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा जन्म सिन्नर तालुक्यातील डुबेरे या गावी झाला. श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या पत्नी आणि श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या मातोश्री राधाबाईसाहेब ह्या बर्वे कुलोत्पन्न होत्या. तत्कालीन प्रथेनुसार राधाबाईसाहेबांचे पहिले बाळंतपण त्यांच्या माहेरी म्हणजे डुबेरे येथे झाले, आणि त्यांनी मराठेशाहीच्या इतिहासात अजरामर झालेल्या किर्तीवंत वीर पुरूषास जन्म दिला. राधाबाईसाहेबांचे पिता मल्हार दादाजी बर्वे हे पेशवे दरबारी वरिष्ठ सरदार होते व ते बर्वे कुळाचे मूळ पुरूष म्हणून ओळखले जातात.

मल्हार दादाजी बर्वे हे पांढुर्ली, पिंपळस, कोठुरे आणि डुबेरे या गावांचे जहागिरदार होते. आजही त्या गावांत बर्वे कुटुंबाच्या जमिनी आहेत आणि किल्लेवजा भव्य चौसोपी वाडे, या गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार म्हणून डौलाने उभे आहेत. विशेषत: श्रीमंत बाजीरावांच्या जन्मस्थळाची वास्तू अंदाजे दोन एकर जागेत आजही सुस्थितीत उभी आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात काळानुरूप शेत जमिनीसंबंधित असलेले कायदे अस्तित्वात आले. कूळ कायदा, कसेल त्याची जमीन, कमाल जमीन धारणा कायदा वगैरे नियोजनशून्य आणि अतार्किक कायद्यांमुळे शेकडो हेक्टर जमिनी एक तर कुळांच्या किंवा सरकारच्या ताब्यात गेल्या. पण अशा विपरित परिस्थितीशी धोरणात्मक व्यूहरचना


महाराष्ट्र शासन
कृषि विभाग

श्री. उद्धव ठाकरे
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सन्मानपत्र

रब्बी हंगाम 2020-21
राज्यस्तरीय पिक स्पर्धा विजेते

श्री. सुहास वसंतराव बर्वे
गाव - डुबेरे, तालुका - सिन्नर, जिल्हा - नाशिक

गहू
हेक्टरी ९० क्विं.७१ किलो
एवढे उच्चांकी उत्पादन घेऊन सर्वसाधारण गटात
राज्यस्तर प्रथम क्रमांक
मिळविल्याबद्दल
मा. ना. श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य),
मा.ना.श्री. बाळासाहेब थोरात (मंत्री, महसुल),
मा.ना.संदिपान भुमरे (मंत्री, रोजगार हमी, फलोत्पादन),
मा.ना.डॉ. विश्वजीत कदम (राज्यमंत्री, कृषी),
मा.ना. कुमारी आदिती तटकरे (राज्यमंत्री, फलोत्पादन)
यांच्या उपस्थितीत हे प्रशस्तीपत्र देऊन आपला सन्मान करण्यात येत आहे.

दिनांक : १ जुलै २०२१

दादाजी भुसे
मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य

आखून डुबेरकर बर्वे कुटुंबाने एक इंच जमीन कुळांच्या ताब्यात जाऊ दिली नाही हे कौतुकास्पद आहे. आजमितिस शेत जमीन, गायरान, बैलरान आणि डोंगर धरून शेकडो एकर जमीन स्वत:च्या ताब्यात ठेवण्यात बर्वे कुटुंब यशस्वी झाले आहे. याचे संपूर्ण श्रेय, धोरणी कै. दुर्गाबाई, पुत्र कै. वसंतराव तसेच ॲड. श्री. सुहास, सौ. संध्या व श्री. निखिल बर्वे यांना जाते. अत्यंत धोरणी व कर्तबगार दुर्गाबाईनी पुढच्या पिढीला एक कानमंत्र दिला होता की, तुम्ही ह्या इस्टेटीचे मालक नसून केवळ विश्वस्त आहात, जमल्यास जमिनी वाढवा पण विकण्याचे मनातसुद्धा आणू नका. हा कानमंत्र फक्त बर्वे कुटुंबापुरता मर्यादित नसून समस्त ब्राह्मणांनी आचरणात आणण्यासारखा आहे.

श्रीमंत बाजीरावांच्या मातोश्री राधाबाईसाहेबांपासून ॲड. सुहास बर्वे ९ व्या पिढीतले आणि निखिल १० व्या पिढीतले वारसदार आहेत. तरूण निखिल माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात गले लठ्ठ पगार कमावत आहे, अमेरिका आणि इतर देशात नोकरीच्या अनेक संधी चालून येत असूनसुद्धा निखिलला आपल्या पिढीजात शेतीचे आकर्षण आहे. नवनवीन शेतीच्या प्रयोगांसोबत शेतीसाठी फार मोठी गुंतवणूक करणे, आधुनिक दृष्टिकोनातून धान्य असो वा भाजीपाला, त्यांचे एकरी जास्तीत जास्त उत्पादन कसे करता येईल या कडे त्यांच्या कटाक्ष असतो. सौ. संध्याताई स्वत: शेतावर उभ्या राहून शेतमालाची मोजणी, हिशोब ठेवणे, वगैरे कामात कार्यरत असतात.


आज श्री. सुहास बर्वे यांना राज्य पातळीवरचे गहू उत्पादनाचे विक्रमी उत्पादन घेतल्याबद्दल प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे खरे, पण उत्पादनाचा विक्रम बघता हे देश पातळीवरचे एक किर्तीमानच आहे. केंद्र सरकारनेही या विक्रमाची नोंद घेतल्यास सयुक्तिक ठरेल.

बर्वे कुटुंबाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळणे खचितच गौरवास्पद आहे, पण आपल्या गौरवशाली इतिहासाची संपदा वृद्धिंगत करण्याचा त्यांचा ध्यास, समस्त ज्ञाती बांधवांना प्रेरणादाई आहे.

नाशिक चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे **श्री. सुहास, सौ. संध्या व श्री. निखिल बर्वे यांचे हार्दिक अभिनंदन !**

**– संजय परांजपे,**
नाशिक.


आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...




**एक उपयुक्त दागिना...!**

अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध

अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

**संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य**
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक
* अटी लागू

# काळे's
**रूचकर स्वयंपाक तुमचा...मसाला मात्र आमचा**
संपर्क :- ९७६६९९१११० ओंकार काळे / ७०२०६२७६२९ सरोज काळे

● चहा मसाला ● चाट मसाला ● बिर्याणी मसाला
● पावभाजी मसाला ● गोडा मसाला ● किचनकिंग मसाला
● पाणी पुरी मसाला ● सांबार मसाला ● छोले मसाला
● शाही पनीर मसाला ● मालवणी मसाला
● काळा मसाला ● दाबेली मसाला ● गरम मसाला
● थालीपीठ भाजणी ● उपवास थालीपीठ भाजणी

**आमची वैशिष्ट्ये**
● सर्व मसाले घरच्या गिरणीवर दळले जातात.
● कुठलाही रंग अथवा प्रिझर्वेटिव्ह घातले जात नाही.
● यामुळे मसाल्याचा रंग आणि नैसर्गिक सुगंध तसाच टिकून राहतो.
● १००% नैसर्गिक
● १००% केमिकल विरहित
● प्रत्येक वेळेस खडे मसाले चाळून व निवडून घेतले जातात.
● रुचकर आणि चवदार

**संतुष्ट ग्राहक हाच आमच परिवार...**
**या आमच्या परिवारात सामील व्हा.**

# सुखांत जीवनाचा

**लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक**

अतिशय गंभीर आजार झालेला रूग्ण, तो सक्षमपणे विचार करण्याच्या परिस्थितीत असतानाच त्या आजाराचे स्वरूप बळावल्यानंतर भविष्यात, जेव्हा तो आजार आता कधीही बरा होणार नाही अशा टप्प्यावर आल्यावर किंवा जेव्हा रूग्ण त्या आजारामुळे स्वत:ची जाणीव हरवून बसेल त्यावेळी त्या रूग्णावर, म्हणजे स्वत:वर होत असलेली औषध उपाय योजना थांबवावी, त्याचा स्वत:चा मृत्यू लांबवू नये, (Do not Recesutate DNR) जेव्हा केव्हा त्याला नैसर्गिक मृत्यू येईल तेव्हा तो येऊ दे अशा आशयाची इच्छा या लिव्हिंग विल मध्ये करून ठेवलेली असते. प्रत्येक माणसाला त्याचे जीवन जगण्याची स्वायत्तता (Individual Autonomy) आहे हे तत्व या मागे आहे.

**समाजाचे दडपण -**

त्या रूग्णाच्या आजूबाजूला वावरणाऱ्या नातेवाईकांव्यतिरिक्त, इतर स्नेही, आप्तस्वकीय किंवा समाजातील इतर लोकांना नेहमीच वाटत असते की रूग्णाला त्याच्या अंतापर्यंत, डॉक्टरांनी त्याला मयत घोषित करेपर्यंत जास्तीत जास्त चांगला उपचार, औषधे दिली पाहिजेत. ते काही अशी बरोबरही आहे. परंतु रूग्णाचा आजार अशा टप्प्यावर आहे जिथे कितीही व कोणतीही औषधे दिली, उपचार केले, तरी आजार बरा होणारा नाही, फक्त त्या रूग्णाचा मृत्यू यंत्रसामुग्रीद्वारे लांबवलाच जाणार आहे, या गोष्टीचा तसेच त्या रूग्णाला जर तो शुद्धीत असेल, त्याच्या संवेदना जागृत असतील तर किती असह्य यातना होत असणार व केवळ समाज काय म्हणेल किंवा आप्त स्वकीय काय म्हणतील म्हणून त्या रूग्णाला असह्य यातना, ज्या मधून तो आता कधीही बाहेर पडू शकणार नाही, अशा यातना सहन करीत ठेवायचे का? हाही विचार यावेळी केला गेला पाहिजे.

येथे पुन्हा अशा स्वरूपाच्या औषध उपचारांना लागणाऱ्या वारेमाप खर्चाचाही विचार होणे आवश्यक आहे. जरी रूग्णाची वा त्याच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मजबूत आहे, ते सर्व वाटेल तेव्हढा खर्च करण्यास सक्षम आहेत असे जरी गृहित धरले तरी आजाराच्या त्या टप्प्यापर्यंत केल्या गेलेल्या खर्चानंतरही, आता यापुढे होणाऱ्या वारेमाप खर्चाचा काहीही उपयोग नाही अशी जेव्हा वेळ येते तेव्हा कोठे थांबायचे हा सूज्ञ विचार करणेही आवश्यक आहे.

ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असते, त्यांनी तर जरूर या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. काही वेळेला रूग्णावर जास्तीत जास्त व शेवटपर्यंत चांगला उपचार होण्यासाठी व तो बरा होईल या आशेवर घरदार, शेतीवाडी गहाण ठेऊन, कर्ज काढून वारेमाप खर्च केला जातो व शेवटी ते कुटुंब देशोधडीला लागते. त्यात त्या कुटुंबात शिक्षण घेणारी मुले असतील, मुली ज्या आता लग्नाच्या वयाच्या झाल्या आहेत किंवा होणार आहेत किंवा इतर कुटुंबीय आजारी आहेत किंवा इतर निरनिराळ्या अडचणी, आर्थिक, वैयक्तिक अडचणी असतील, तर त्या कुटुंबाची होणारी ससेहोलपट बघवली जात नाही. बरं, इतके करूनही ज्या रूग्णासाठी हा सर्व खटाटोप चाललेला असतो, त्याचा आजार, मग तो कोणताही असो, असा आजार, कधीही बरा न होण्याच्या अवस्थेत पोहोचलेला असेल तर परिस्थिती नक्कीच विचार करण्यासारखी असते. काही वेळेला ''आता औषधोपचारांचा काही उपयोग होणार नाही'' अशा आशयाच्या वैद्यकिय सल्ल्याच्या विरूद्ध जाऊन, किंवा तो न ऐकून रूग्णावर औषधोपचार चालू ठेवण्याचा, शस्त्रक्रिया करण्याचा आग्रह प्रेमापोटी किंवा लोक काय म्हणतील या दडपणापोटी केला जातो. तेही कितपत योग्य आहे. याचा विचार झाला पाहिजे.

## ❊ सूचना ❊

ज्या सभासदांनी आपले जुने निवासस्थान सोडून इतरत्र नवीन निवासस्थान घेतले असेल त्यांनी आपला नवीन पूर्ण पत्ता कार्यालयीन वेळेत येऊन त्याचा तपशील द्यावा व नवीन पत्त्याची नोंद करावी.

पत्ता बदललेला असल्याने अंक परत येत आहेत.

कृपया याची नोंद घेऊन गैरसोय टाळण्यासाठी सहकार्य करावे.

– **व्यवस्थापक**

**वैद्यकिय नैतिकशास्त्र -**

वैद्यकिय व्यवसायिकांना वैद्यक व्यवसायात येताना व्यवसायातील काही नैतिक तत्वे ज्याला Ethics म्हटले जाते, अशी तत्वे घालून दिलेली असतात व ती पाळण्याबद्दलची शपथ पण दिलेली असते. रूग्णावर उपचार करताना, त्या त्या आजारावरील उपचारांबाबतचा प्रोटोकॉल (घालून दिलेले निर्देश) पाळण्याची जबाबदारी डॉक्टरांवर असते. त्यामुळे टर्मिनली इल् पेशंटवर औषधोपचार थांबवावा की नाही, पेशंट किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या इच्छेप्रमाणे, त्या रूग्णाच्या किंवा त्याच्या आजाराच्या शेवटच्या स्टेजला / टप्प्यावर काय निर्णय घ्यावा या बाबत वैद्यकिय व्यवसायिक बऱ्याच वेळेला शाशंक असतात. निष्काळजीपणाचे आरोप होऊन फौजदारी किंवा नुकसान भरपाईच्या कारवाईला सामोरे जावे लागेल ही भीतीपण त्यांच्या मनात असणे साहजिकच आहे. त्यात, सध्याच्या राजकिय व सामाजिक परिस्थितीमुळे भरच पडली आहे. रूग्णाच्या नातेवाईकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल ही गंभीर भीतीदेखील सध्याच्या काळात प्रत्येक वैद्यकिय व्यावसायिकांच्या मनात घोळत असते. **या गोष्टींचा अतिशय गंभीरपणे विचार करूनच मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यावरही योग्य त्या उपाय योजना सुचविलेल्या आहेत.**

ॲडव्हान्स डायरेक्टिव्ह किंवा ॲडव्हान्स मेडिकल डायरेक्टिव्ह म्हणजेच रूग्णाने आधीच विशिष्ट परिस्थितीत त्याच्यावर होणाऱ्या वैद्यकिय औषधोपचारांबद्दल केलेल्या सूचना हे तत्व जगामध्ये जवळपास पन्नास देशात अमलात आणले जात आहे. त्यापैकी काही देशात तसा कायदा पारित झालेला आहे व काही देशांमध्ये न्याय निर्णयांच्या आधारावर असे डायरेक्टिव्ह प्रचलित आहेत. फ्लोरिडा राज्यात DNRO (डुनॉट रस्युसिटेट ऑर्डर) हृदयविकाराच्या झटक्यात किंवा श्वासोच्छवासाच्या गंभीर आजारात माझ्यावर उपचार करू नये अशा स्वरूपाचे निर्देश देण्याचे प्रचलित आहे. फ्लोरिडा राज्यात एकदा एक बेशुद्ध अवस्थेतील पेशंट जो गंभीर अवस्थेत होता, त्याला ऑपरेशन टेबलवर घेतल्यावर त्याच्या छातीवर ''डू नॉट रेस्युसिटेट'' असे गोंदलेले आढळले! डॉक्टरांनीसुद्धा त्या पेशंटच्या इच्छेला मान दिला. असे ऐकिवात आहे.

यामधील गमतीचा भाग सोडून दिला तरी, रूग्णाच्या इच्छेला किती मान द्यायला पाहिजे, विशेषत: तो जेव्हा कधीही बरा न होणाऱ्या आजाराच्या टप्प्यावर, अवस्थेत असेल तेव्हा, हे अतिशय महत्त्वांचे आहे. यालाच मनुष्याची स्वत:चे जीवन जगण्याची स्वायत्तता (ॲटोनॉमी) म्हटलेलं आहे व त्याला कायद्याच्या चौकटीतही अत्यंत महत्त्व दिलेले आहे.

त्यामुळे अशा स्वरूपाच्या ॲडव्हान्स मेडिकल डायरेक्टिव्ह दिलेल्या असतील, रूग्णाने लिहुन ठेवलेल्या असतील तर त्या रूग्णाच्या शेवटच्या काळात ट्रिटमेंट थांबवायची की नाही? काय निर्णय घ्यायचा? या बाबत निर्णय घेताना वैद्यकिय व्यावसायिकाला अडचण वाटणार नाही व तोही अतिशय मोकळेपणाने रूग्णाला किंवा त्याच्या नातेवाईक, आप्तस्वकीयांना योग्य तो सल्ला देऊ शकतो, अशाच डायरेक्टिव्हजना आपण ''लिव्हींग विल'' म्हणून संबोधतो.

अशा प्रकारचे ॲडव्हान्स डायरेक्टिव्ह किंवा लिव्हींग विल कशी, कधी कोणी करायची, त्याची पद्धत काय, ती कशी अमलात आणायची याचा आपण आता उहापोह करू.

**लिव्हींग विल -**

**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायाधीशांच्या खंडपिठाने ''कॉमन कॉज विरूद्ध युनियन ऑफ इंडिया, रिट पिटीशन नंबर (सिव्हिल) २१५/२००५ मध्ये ॲडव्हान्स डायरेक्टिव्ह किंवा लिव्हींग विलबाबत जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत व जी मार्गदर्शक तत्वे, केंद्र सरकार या बाबतचा कायदा पारित करीत नाही तो पर्यंत ज्याचा अंमल रहाणार आहे, त्या मार्गदर्शक तत्वांचा आपण विचार करूयात.**

येथे अत्यंत नम्रपणे नमूद करणे गरजेचे वाटते की वरील न्याय निर्णयाच्या परिच्छेद क्र. १९१ (अ) ते (फ) आणि परिच्छेद क्र. १९२ ते परिच्छेद १९४ पर्यंतच्या निर्देशित तत्वाचा खाली मराठीत स्वैर अनुवाद करून दिला

## ❊ संस्थेतर्फे आवाहन ❊

सर्वांना आवाहन करण्यात येत आहे की जर कोणाला अशा कुटुंबांबद्दल अथवा विद्यार्थ्यांबद्दल माहिती असेल की जे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आर्थिक अडचणीत आली आहेत, अशा व्यक्तींची माहिती आपण कृपया संस्थेकडे द्यावी. अशा सर्व कुटुंबियांची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी संस्था घेईल. आपण अशा व्यक्तीची माहिती संस्थेस दिली तर संस्थेचे पदाधिकारी स्वत:हून त्यांच्यापर्यंत पोहोचून योग्य ती कार्यवाही करतील. तरी आपण कृपया सहकार्य करावे ही विनंती. धन्यवाद...!

आहे. हे करीत असताना मा. सर्वोच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे जशीच्या तशी मराठीत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये थोड्या प्रमाणात काही चुका झाल्यास त्यामागे मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करण्याचा अजिबात उद्देश नाही. केवल मा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली लिव्हींग विलसंदर्भात, ज्या बाबत अजून कायदा पारित झालेला नाही, अशी मार्गदर्शक तत्वे सामान्य जनतेपर्यंत सोप्या भाषेत पोहचावी व त्याचा त्यांना उपयोग व्हावा हाच एक प्रामाणिक हेतू या मागे लेखकाचा आहे. ही पुस्तिका वाचून ज्या कोणाला अशी लिव्हींग विल किंवा ॲडव्हान्स्ड मेडिकल डायरेक्टिव्ह लिहायची इच्छा होईल त्यांनी स्वतंत्रपणे वर उल्लेखिलेला न्याय निवाडा व त्यातील मार्गदर्शक तत्वे वाचावीत, समजून घ्यावीत व त्याबाबत योग्य तो कायदेशीर व वैद्यकिय सल्ला घेऊनच स्वत:चा निर्णय घ्यावा असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

**लिव्हींग विल कोणी, केव्हा व कसे करावे :**

A] **लिव्हींग विल / ॲडव्हान्स्ड मेडिकल डायरेक्टिव्ह कोणी करावेत?**

– लिव्हींग विल सज्ञान व्यक्ती जी मानसिकदृष्ट्या सक्षम व सुदृढ आहे आणि ज्याला आपल्या विचारांचे आदानप्रदान करता येते आणि ज्याला लिव्हींग विल करण्याचा उद्देश व त्याचे पुढील परिणाम पूर्णपणे माहित आहेत व ते त्याने समजून घेतलेले आहेत.

– लिव्हींग विल करण्याचा निर्णय त्या व्यक्तीने त्याचे परिणाम पूर्णपणे समजून उमजून स्वत:हून घेतलेला असला पाहिजे. असा निर्णय त्याने कोणत्याही दडपणाखाली किंवा कोणत्याही आमिषाला बळी न पडता घेतलेला असला पाहिजे. असा निर्णय पूर्णपणे माहिती घेऊन व त्याच्या परिणामांची जाणीव ठेवत घेतलेला असला पाहिजे.

– अशा लिव्हींग विलमध्ये ते विल करणाऱ्याने त्याबाबतच्या सर्व बाबी व वस्तुस्थिती समजून उमजून ते करण्यासाठी संमती दिलेली असल्याबद्दल स्पष्ट उल्लेख असणे व त्यातील मजकुराने तसे ध्वनीत होणे आवश्यक आहे.

– त्या लिव्हींग विलमध्ये वैद्यकिय औषधोपचार नक्की कधी थांबवायाचा आहे किंवा नक्की कोणत्या प्रकारचा औषधोपचार किंवा पद्धत ज्यामुळे त्या व्यक्तीला केवळ दु:ख यातना किंवा मनस्तापच होणार आहे अशी पद्धत. थांबवायची किंवा द्यायची नाही याचा स्पष्ट उल्लेख असावा.

**(क्रमश:)**

## ✻ देणगी ✻

१) **श्री. आशुतोष शरद भिडे,** रु. १०,०००/– शैक्षणिक मदतीसाठी. संस्थेतर्फे कृतज्ञापूर्वक स्विकार आणि देणगीदारांचे मन:पूर्वक आभार...!

२) **सौ. नीता वसंत गाडगीळ** यांच्याकडून आई वडील श्रीपाद नारायण जोशी, सौ. मनोरमा श्रीपाद जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ रु. १०,०००/– संस्थेतर्फे कृतज्ञता पूर्वक स्विकार आणि देणगीदारांचे मन:पूर्वक आभार...!

## ✻ भावपूर्ण श्रद्धांजली ✻



**सौ. सुचेता विनायक कोल्हटकर** यांचे वयाच्या ६० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. संस्थेचे सभासद विनायक हरी कोल्हटकर यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धाजली.


## ✻ संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी ✻

सभासदांच्या पाल्यांसाठी सवलतीच्या दरात वह्या उपलब्ध.

**काका गद्रे मंगल कार्यालय**

गोळे कॉलनी, नाशिक.

**वेळ – सकाळी १० ते १**

# सुनील केळकर : एक संघसमर्पित कार्यकर्ता:



मनमाड शहरातील संघ स्वयंसेवक व वनवासी कल्याण आश्रमाचे उपाध्यक्ष सुनील केळकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या जाण्याने शहराने एक सच्चा स्वयंसेवक, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा धनी गमावला आहे. सुनील केळकरच नव्हे, तर त्यांचा संपूर्ण परिवारच संघनिष्ठ आहे.

मूळचे नाशिकचे असलेल्या, सुनीलजींचे शालेय शिक्षण नाशिकच्या सुप्रसिद्ध पेठे विद्यालयात झाले. विद्यार्थीदशेतच ते शाखेत जाऊ लागले. तसं बघायला गेलं तर त्यांचा पूर्ण परिवार संघमय होता. त्यामुळे बालपणापासूनच संघ संस्कारांची जन्मगुटी त्यांना मिळाली. उच्च शिक्षण घेतल्यानंतर मनमाड येथे हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये सुनीलजी १९७८ साली रुजू झाले व कायमचेच मनमाडकर झाले.

३५ वर्षं त्यांनी कंपनीत सेवा बजावली व त्यातील जवळपास सर्वच सेवा ही कंपनीच्या अर्थ शाखेत बजावली. त्यांचे अर्थनियोजन पक्के होते. हिशोबात चोख, काटेकोर असल्याने ते कंपनीत नावलौकिक मिळवून होते. कंपनीत सेवा करीत असतानाच ते संघकार्यात देखील सहभागी होत असत.

त्यांच्या पत्नी शोभना, राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून नारीशक्तीचा विकास करण्यासाठी सदैव तत्पर असतात. त्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाच्या धनी असल्याने मनमाड महाविद्यालयात त्यांची व्याख्याने झाली आहेत. वनवासी कल्याण आश्रमाच्या 'भाऊबीज' योजनेत निधी संकलनात त्यांचा मोठा सहभाग असतो. त्यामुळे कुटुंबातून सुनीलजींच्या संघकार्याला सदैव प्रोत्साहनच मिळत असे. सुनीलजींचा संपूर्ण परिवारच संघमय आहे. त्यांचे बंधू उज्ज्वल काही वर्षे संघ प्रचारक होते. ते आता सातारा येथे स्थायिक आहेत. दुसरे बंधू पराग, कुटुंबासह पूर्ण वेळ वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यात समर्पित आहेत. पुतण्या अक्षय संघ प्रचारक आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी पूर्ण वेळ स्वत:ला संघकार्यात झोकून दिले. वनवासी कल्याण आश्रम, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, संघ परिवारातील इतर संस्थांच्या कामाची जबाबदारी त्यांनी स्विकारली.

सुनीलजी गेले असले, तरी त्यांनी उभ्या केलेल्या कार्याच्या निमित्ताने त्यांच्या स्मृती चिरंतन राहतील, यात शंका नाही. त्यांनी सुरू केलेले कार्य पुढे नेणे, हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.

## ✻ सूचना ✻

आपल्या संस्थेचे मुखपत्र **'चित्तपावन मित्र'** दर महिन्यास प्रसिद्ध केले जाते. ज्यात लेख, कविता, अभिनंदन व श्रद्धांजली इत्यादीसाठी प्रसिद्धी दिली जाते. चित्तपावन मित्र या वृत्त संस्थेचे कार्यालय **काका गद्रे मंगल कार्यालय,** गोळे कॉलनी, नाशिक येथे आहे.

कार्यालयीन वेळ स. ९.३० ते १.३० अशी आहे. आपणास द्यावयाचे वृत्त या वेळेत आपण आणून द्यावयाचे आहे.

कृपया संपादक, कार्यकारी मंडळ, कर्मचारी वर्ग यांच्या मोबाईलवर पाठवू नये.

दिनांक २५ पर्यंत येणाऱ्या वृत्तास पुढील महिन्याच्या अंकात जागेच्या उपलब्धतेनुसार प्रसिद्धी दिली जाईल.

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

मिहिर कन्स्ट्रक्शन

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर


**ऑफिस :** २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल :** ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

## सुवर्ण संचय समृद्धी योजना



बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!
गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?
सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?
पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

**थांबा, काळजी करू नका, आपली ही काळजी दूर झाली आहे.**

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा. ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा. लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.

**आमचे ध्येय... "तुमची धनसमृद्धी"**

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था**
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

**टकले बंधू, सराफ बाजार**
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

**विचार कसला करताय, येताय ना मग !**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.